RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १८१] बुधवार, डिसेंबर १७, २०२५/अग्रहायण २६, शके १९४७ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४६०

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१, दिनांक १७ डिसेंबर, २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक संकीर्ण २०२२/ प्र.क्र.५६५ /आस्था-१२.—-महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. अधि ५) याच्या कलम २७४ च्या पोट-कलम (२) खंड (३९) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन याव्दारे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हासेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

### नियम

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२५ असे संबोधण्यात येईल.

सदर नियम **शासन राजपत्र** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील परिशिष्ट पाच-अ मध्ये जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३/गट-क) (आरोग्य) श्रेणी-३ मधील अनुक्रमांक एक येथील आरोग्य कर्मचारी नोंदीसमोर स्तंभ क्र.४ मध्ये, "नियुक्तीसाठी पात्रता आणि पद्धती" या शीर्षकाखाली, प्रचलीत नियमाऐवजी, पुढीलप्रमाणे सुधारित नियम करण्यात येत आहे, म्हणजे :—

"(१) आरोग्य सेवक (पुरुष) पदावर यापैकी एका प्रकारे नेमणूक केली जाईल,—

"(अ) जिल्हा परिषद सेवेतील गट-ड (परिचर) हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून पात्रता व ज्येष्ठतेच्या अधीन, खालील निकष पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने, म्हणजे,—

(१) विज्ञान या विषयासह उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य अर्हता परीक्षा उत्तीर्ण; आणि

परंतु असे की, सदरचे सेवाप्रवेश नियम प्रसिद्ध झालेल्या दिनांकापूर्वी जिल्हा परिषद सेवेत असलेल्या गट-ड (परिचर) पद धारण करणाऱ्या आणि तीन वर्ष नियमित सेवा करणाऱ्या आणि ज्यांनी माध्यमिक शालान्त परिक्षा उत्तीर्ण केली आहे. अशा व्यक्ती देखील जेष्ठतेच्या अधिन राहुन सदरचे सेवाप्रवेश नियम प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पूढील पाच वर्षांपर्यंत पदोन्नतीसाठी पात्र राहतील.

(२) आणि, अशा पदोन्नती प्राप्त कर्मचाऱ्यांना शासनाच्या विभागीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आणि सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडून घेण्यात येणारा बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) किंवा शासनाने समकक्ष ठरवलेल्या इतर संस्थेतील अभ्यासक्रम तीन संधीमध्ये यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

(ब) निवड समितीने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे निवडलेल्या व खालील निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने, म्हणजे,—

(१) वयोमर्यादा :—

(अ) किमान वयोमर्यादा.—पदावरील भरतीसाठी जाहिरातीनुसार अर्ज प्राप्त करण्याच्या शेवटच्या तारखेला किमान अठरा वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहिल.

(ब) कमाल वयोमर्यादा.—पदावरील भरतीसाठी दिलेल्या जाहिरातीनुसार अर्ज प्राप्त होण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत, आरक्षित प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींचे वय अडतीस वर्षांपेक्षा जास्त असू नये आणि आरक्षित प्रवर्गातील व्यक्तींचे वय त्रेचाळीस वर्षांपेक्षा जास्त असू नये.

(२) किमान शैक्षणिक पात्रता :—

(अ) विज्ञान या विषयासह उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य अर्हता परीक्षा उत्तीर्ण; आणि

(ब) बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) यांचेसाठी शासनाच्या विभागीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आणि सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांचेकडून घेण्यात येणारे १२ महिन्यांचे मूलभूत प्रशिक्षण किंवा शासनाने समकक्ष ठरवलेल्या इतर संस्थेतील अभ्यासक्रम तीन संधीमध्ये यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

(२) आरोग्य सेवक (पुरुष) या पदावरील पदोन्नती व नामनिर्देशन यांचे प्रमाण अनुक्रमे २५:७५ असे राहील.

(३) आरोग्य सेवक (पुरुष) पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, विभागीय सेवा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल किंवा ती परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, जेथे लागू असेल तेथे, त्याबाबतीत केलेल्या नियमानूसार ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(४) (१) पदोन्नतीने आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा दोन्ही परीक्षांसंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, मराठी आणि हिंदी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा ते पदोन्नतीस पात्र होणार नाहीत.

(२) आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमांत नमूद केलेल्या विहित मुदतीत हिंदी

भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

(५) (१) पदोन्नतीने आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करणे अथवा संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यापासून पदोन्नती पूर्वी सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील.

(२) आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, संगणक आर्हता प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमांत नमूद केलेल्या विहीत मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास, सदर संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

(६) (१) आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर नामनिर्देशनाद्वारे नेमणुकीसाठी शिफारस केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार व त्याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश व अनुदेश यानुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर केल्याच्या तारखेला दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्यास संबंधित उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र राहील.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर तिला दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास, ती शासकीय सेवेत सदर पदावर सेवा चालू ठेवण्यास अपात्र ठरेल.

(७) कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीनंतर, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश किंवा निर्णय यामध्ये विर्निर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील, या नियमान्वये नियुक्ती केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास लागू राहतील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुभाष इंगळे,**
शासनाचे उप सचिव.